## स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०, E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

**प्रेसनोट** दिनांक:- २०/०७/२०१८

# मालेगावसह धुळे जिल्हयात घरफोडया करणारा अट्टल गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात

## १२ तोळे सोन्यासह साडे सहा लाखांचा मुद्देमाल हस्तगत

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो.** यांनी मालेगाव शहरातील वाढत्या चो-या/घरफोडीचे गुन्हयांना प्रतिबंध होणेसाठी रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा सध्यस्थितीचा आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन व सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी मालेगाव शहरातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांची गुन्हा करण्याची पध्दत, त्यांचा सध्याचा ठावठिकाणा तसेच त्यांचे संपर्कात असलेले इतर जिल्हयातील गुन्हेगारांची सविस्तर माहिती घेवुन स्थागुशाचे पथकास सतर्क गस्त घालणेबाबत सुचना दिल्या होत्या.

दिनांक १९ जुलै २०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी मालेगाव शहरातील अख्तराबाद परिसरात गस्त घालत असतांना, पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना खब-यांमार्फत मिळालेल्या माहितीनुसार शहरातील देवीचे मंदिर भागात काही इसमांकडे चोरीचे दागिने असुन ते त्यांचेकडील इंडिगो कारमध्ये कोठेतरी घेवुन जाण्याचे तयारीत असल्याचे समजले. त्याप्रमाणे स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर ठिकाणी सापळा रचुन संशयीत **इसम नामे १) शेख इम्रान शेख खालीद उर्फ इम्रान बाचक्या,** वय २४, रा. **वडजाई रोड, धुळे, हल्ली अख्तराबाद, देवीचा मळा, मालेगाव** यास सफेद रंगाची इंडिगो कार क्रमांक एम.एच.०४.डी.वाय.५९०१ सह ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमाची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात सोन्याचे दागिने मिळुन आले, तसेच इंडिगो कारची झडती घेतली असता कारमध्ये चांदीचे दागिने, एक निकॉन कंपनीचा डिजिटल कॅमेरा, एक सॅमसंग मोबाईल व ०२ लॅपटॉप मिळुन आले. सदर इसमास पोलीस खाक्या दाखविताच त्याने त्याचा साथीदार नामे २) शाहरूख शेख अजीज शेख उर्फ शाहरूख बोबडया, रा. मगडी रोड धुळे याचेसह गेल्या ०८ ते १० महिन्यांपासुन मालेगाव शहरातील विविध भागांमध्ये बंद घरांवर पाळत ठेवुन घरफोडया केल्या असल्याची कबुली दिली आहे.

वरील दोन्ही आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन ताब्यात घेतलेला आरोपी नामे याचे कब्जातुन **१२ तोळे सोन्याचे दागिने** (नेकलेस, ब्रासलेट, पॅन्डल, आंगभ्या, चैन, कर्णफुले, मुरण्या), **२१५ ग्रॅम चांदिचे दागिने, ०२ लॅपटॉप, एक सॅमसंग मोबाईल, ०१ निकॉन कुलपिक्स डिजीटल कॅमेरा** असा मुद्देमाल तसेच **गुन्हयात वापरलेली इंडिगो कार** क्र. एम.एच.०४.डी.वाय.५९०१ व चोरीची **पॅशन प्रो मोटर सायकल** असा **एकुण ०६ लाख ४० हजार ५९० रुपये किंमतीचा ऐवज हस्तगत** करण्यात आलेला आहे. सदर आरोपीने कबुली दिलेवरून **मालेगाव कॅम्प, छावणी तसेच धुळे शहर पोलीस ठाणेस** दाखल असलेले **घरफोडीचे ०५ तसेच मोटर सायकल चोरी ०१ असे एकुण ०६ गुन्हे** उघडकीस आलेले आहे. ताब्यात घेतलेले आरोपीचा दुसरा साथीदार नामे शाहरूख बोबडया याचा स्थागुशाचे पथक शोध घेत असुन त्याचेकडुन घरफोडीचे अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक **श्री.संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. हर्ष पोद्दार सो.**यांचे मार्गदर्शनाखाली सदर कारवाईत **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, सहा. पोलीस निरीक्षक श्री. संदिप दुनगहु, सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा राजु मोरे, वसंत महाले, सुनिल पानसरे, पोना राकेश उबाळे, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ, निलेश कातकाडे, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, संदिप लगड यांचे पथकाने सदर आरोपीस ताब्यात घेवुन गुन्हे उघडकीस आणलेले आहे. स्थानिक गुन्हे शाखेतर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की बाहेरगावी जातांना आपले मौल्यवान दागिने सोबत घेवुन जावे, तसेच शेजारचे रहिवासी अथवा नजीकचे पोलीस ठाणेस माहिती द्यावी.